ग्रंथाली वाचक चळवळीचे

# रुची

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे अटलांटा अधिवेशन
विशेषांक / जुलै २००५



## महाराष्ट्र माझा

# रुची
जुलै २००५

**ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक**

**बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अटलांटा अधिवेशनानिमित्त विशेषांक**


**वर्ष २४ वे, अंक ७ वा, मूल्य ५० रुपये**

संपादक : **दिनकर गांगल**

अतिथी संपादक : **पद्मभूषण देशपांडे**

संपादकीय सहाय्य : **अरुण जोशी, राजीव जोशी**

विशेष सहाय्य : **विनायक कुळकर्णी, महेंद्र पवार, सविता शेलार**

जाहिरात व्यवस्था : **सुदेश हिंगलासपूरकर**

मुखपृष्ठ/मांडणी/चित्रे : **प्रदीप म्हापसेकर**

अक्षरजुळणी : **अनिरूद्ध गद्रे, ग्रंथाली जुळणी विभाग**

**वार्षिक वर्गणी**
**संस्थांना १०० रुपये**
**व्यक्तींना ६० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट/मनीऑर्डर 'ग्रंथाली' नांवाने**



पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता :

- **ग्रंथाली**, महापालिका शाळेची इमारत, पहिला मजला, टोपीवाला लेन, डॉ. भडकमकर मार्ग पोलिस स्टेशनसमोर, ग्रँटरोड, मुंबई ४०० ००७ फोन : २३८७ ५४८१
- **ग्रंथाली**, इंडियन एज्युकेशन सोसायटीची म. फुले कन्याशाळा, बाबरेकर मार्ग, गोखले रोड (उ), दादर, मुंबई ४०० ०२८ फोन : २४४७ ४८ ४३
- ई-मेल : granthali01@rediffmail.com आणि granthali01@yahoo.com
- वेबसाईट : www.marathividyapeeth.org



*अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'रुची' हे मासिक व्यासपीठासमान आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.*




## महाराष्ट्र माझा


- **राजकारण्यांची पुढची पिढी आणि महाराष्ट्राची अवघड घडी :** दीपक लोखंडे/४
- **प्रायोजित स्फूर्तीनेच समाजकार्य घडणार? :** अनिल शिदोरे/८
- **लाजिरवाण्या अवस्थेचे राज्यकर्त्यांना भान नाही :** गिरीश कुबेर/१२
- **वरवरची रंगसफेती आणि 'मराठी अस्मिते'चा घोष :** महेश केळुसकर/१६
- **जागतिकीकरणाच्या आव्हानाला साजेसे बदल :** डॉ. भूषण पटवर्धन/२६
- **'लुंपेन लिटरेटियाट' असतील जेथे... :** जयदेव डोळे/३८
- **हिंमत हरलेल्या शेतकऱ्याला नव्या नेतृत्वाची आस :** मुकुंदराव गायकवाड/६२
- **कविता :** मृत्यूचं गर्वहरण : अरुण जोशी/६६
- **कथा :** सौदामिनी : सुरेश वाघे/७७
- **मुलाखत : 'मदत स्वीकारण्यापूर्वी स्वयंसेवी संस्थांनी हेतू तपासला पाहिजे' :** डॉ. मुकुंद घारे. मुलाखत : सु. गो. तपस्वी/८९


### प्रायोजित विभाग


- **बचतगटांद्वारे ग्रामीण विकासाला गती देणारी भारतीय स्टेट बँक :** संदीप पंडित/१७
- **मुंबईकरांसाठी पुनर्बांधणी प्रकल्प राबवणारे शिवम**/२९
- **साई लीचे सर्वेसर्वा - समाजभूषण मंगेश सावंत**/४५
- **बँक ऑफ बडोदा - भारताची आंतरराष्ट्रीय बँक**/४९
- **गृहनिर्माण क्षेत्रातला 'स्पार्क' :** महेंद्र पवार /५३
- **विवा ग्रुप :** संदीप पंडित/५७
- **'जैन उद्योगा'च्या अशोक जैन यांची मुलाखत :** राजीव जोशी/६९
- **गुणवत्ताचा मापदंड... गोयल गंगा ग्रुप**/७४
- **महाराष्ट्र अधिक प्रगतीशील आणि समृद्ध करणारी - युनायटेड वेस्टर्न बँक :** विनायक कुळकर्णी/८५
- **मोठ्या बँकेचे सामर्थ्य, छोट्या बँकेची तत्परती सारस्वत बँक**/९२

'जैन उद्योगा'च्या दुसऱ्या पिढीचा आशावाद

# उद्याच्या महाराष्ट्रात भूमिपुत्रांचा सहभाग

## अशोक जैन

प्रश्न : जैन उद्योगाची वैशिष्ट्ये कोणती?

उत्तर : देशामध्ये 'शेती आणि पाणी' या विषयात बांधिलकी मानून, मागास विभागातच राहून पायोनिअरिंग काम करणाऱ्या आमच्या जैन उद्योगाची पुढील वैशिष्ट्ये आहेत.

- सामान्य आणि अकसबी, प्रशिक्षित नसलेल्या माणसांकडून असामान्य कामं करून घेण्याची पद्धत रुजवली.
- 'मीच माझ्या कामाचा मालक' हे तत्त्वज्ञान रुजवून पुस्तकी ज्ञानापेक्षा अनुभवांवर भरवसा, लवचिकता अंगी बाणवली.
- उद्योगामधील वातावरण 'एकत्र कुटुंबासारखे' राखले. एकमेकांच्या सुखदु:खाचे भागीदार; त्यामुळे युनियन नाही.



'जैन ग्रुप'चे उपाध्यक्ष
अशोकभाऊ जैन

प्रश्न : पुढील काही वर्षांत 'व्यापार-उद्योगा'व्यतिरिक्त काय करण्याचा मनोदय आहे?

उत्तर : बुद्धिमान आणि धाडसी असणारी महत्त्वाकांक्षी नवी पिढी योग्य मार्गदर्शनाअभावी नोकरीएके नोकरीची जपमाळ घेते आहे. त्यासाठी साजेसे बहुआयामी, विविध क्षेत्रांतलं स्पर्धात्मक शिक्षण देऊन विजिगीषू उद्योजक, कर्तृत्वं घडवायची आहेत.

प्रश्न : सांस्कृतिक-सामाजिक क्षेत्रासाठी काय योजना आहेत?

उत्तर : आमच्या यशात समाजाचं योगदान आहे व म्हणून आम्ही समाजाचं देणं लागतो ही आमची श्रद्धा आहे. मेहनत, प्रामाणिकपणा व बांधिलकी ही त्रिसूत्री आमच्या दृष्टीनं पाया आहे. जैन चॅरिटीज या आमच्या न्यासाद्वारे आम्ही आरोग्य, क्रीडा, संस्कार, संगीत, कला, धर्म, शिक्षण इत्यादी क्षेत्रांत सक्रिय कार्य करतो. स्थानिक कलागुणांना प्रोत्साहन प्राधान्यानं देतो.

प्रश्न : येत्या दहा वर्षांत शेतकी व औद्योगिक क्षेत्रांत आपल्या जैन उद्योगाचा वाटा नेमका कसा असू शकेल?

उत्तर : येत्या दहा वर्षांत भारतातच नव्हे तर जागतिक पातळीवरही शेती क्षेत्रात जैन उद्योगाचा सिंहाचा वाटा असेल. शेती व संबंधित उद्योगांच्या प्रस्थापितच नव्हे तर संशोधनानं, नव्यानं उभारणाऱ्या उत्पादनांच्या बाजार-पेठांमध्येही जैन उद्योग स्वत:च्या गुणवत्तेनं दबदबा निर्माण करून असेल. 'मेड इन इंडिया' या वाक्याला अजोड गुणवत्तेनं वजन प्राप्त करून देऊ. याच वर्षी आमची एकूण निर्यात रुपये ३५० कोटींवर जाते आहे. आज तरी शेती व संबंधि उद्योगांमध्ये इतक्या आत्मविश्वासानं एवढी प्रचंड गुंतवणूक करीत यश मिळविणारी दुसरी संस्था नाही. इथल्या मातीशी अंतिम बांधिलकी मानल्यानं असं यश मिळतं.



• जैन गुरुकुल

### ठिबक सिंचन

वाढत्या लोकसंख्येबरोबरच घटत्या पाण्याच्या प्रमाणामुळं ठिबक सिंचन हा या शतकातील निव्वळ परवलीचा शब्द नव्हे तर शेतीच्या अस्तित्वासाठी रामबाण उपाय मानला जातो आहे. भारतात ठिबक सिंचनासाठी लागणारी उपकरणे बनविणाऱ्या सुमारे ६० कंपन्या आहेत. त्यांपैकी ७ ते १० कंपन्या नावं घेण्यासारख्या आहेत. या सर्वांनी गेल्या १० वर्षांत केलेले एकंदर उत्पादन आपल्या देशाच्या सिंचनयोग्य जमिनींपैकी जेमतेम ३ टक्के जमिनीवरच लागलंय. गरज आणि पुरवठा पाहता येत्या ५० वर्षांत ठिबक सिंचन व्यवसायाला सुवर्णकाळ राहणार हे स्पष्ट आहे. यात उत्पादनाची गुणवत्ता हाच निकष राहील. आम्ही ५५ टक्के बाजारपेठ त्याच बळावर काबीज केलीय.

### पीव्हीसी पाईप्स

वजनाला हलके, कधीही न गंजणारे, विजेची भरपूर बचत करणारे, खूप टिकणारे, वापरायला सोपे असे हे पाईप्स आपल्या गुणांनीच शेतकऱ्यांच्या, तसंच अन्य ग्राहकवर्गाच्या गळ्यातले ताईत बनले. राज्य तसंच केंद्र शासनानं खेडोपाडी, वस्त्या-वस्त्यांत शुद्ध व स्वच्छ पाण्याला, शेतीच्या पाण्याला अनन्यसाधारण महत्त्व आणि प्राधान्य दिल्यानं गेली ३० वर्षं अंगवळणी पडलेले हे पाईप्स यापुढंही घोडदौड करतील. शेतीसाठी, गटारांसाठी, वेल केसिंगसाठी व अन्य बऱ्याच औद्योगिक वापरांसाठी हे पाइप्स आदर्श आहेत.

### एचडीपीई पाईप्स

तंत्रदृष्ट्या पीव्हीसी पाईपांच्या पुढच्या पिढीचे हे पाईप्स गेल्या ३-४ वर्षांत बाजारात आपला जम बसवून राहिलेत. जैन उद्योगाची या पाईपांची उलाढाल तीनच वर्षांत ५५ कोटी रुपयांपर्यंत गेलीय व पुढील वर्षांपर्यंत ती ११० कोटींवर जाईल. हे पाईप शेतीसाठी, पिण्याच्या पाण्यासाठी, घरगुती वापरासाठी, वेल केसिंगसाठी, गॅससाठी, ऑप्टिकल फायबर केबलसाठी अशा बहुविध कामांसाठी सहज आणि बिनधोक वापरता येतात. हे पाईप गुंडाळता येतात आणि सूर्यकिरणांमुळे त्यामध्ये काहीही बदल होत नाहीत. रेल्वे, दूरसंचार, ओएनजीसी, महानगर पालिका,. शेती, खाजगी कंपन्या व महामंडळांचे पान यांखेरीज हलत नाही.

### पीव्हीसी शीट्स


लाकडाला योग्य पर्याय म्हणून निर्माण केलेले हे नव्या युगातील प्लॅस्टिक उत्पादन प्रगत पाश्चिमात्त्य देशांत लोकप्रिय झालंय. जैन उद्योगातर्फे निर्माण होणाऱ्या या उत्पादनापैकी ९० टक्के उत्पादन निर्यात होतं. फर्निचर, साइन-बोर्ड, घर बांधणीस हे उपयुक्त आहे. याची विक्री ६० कोटींवरून यंदा १३० कोटींवर गेलीय. पुढील वर्षी ती २१५ कोटींवर नेण्याचे प्रयत्न आहेत. पर्यावरणाचं रक्षण करणारं हे उत्पादन आपल्याही देशात लोकप्रिय व्हायला हरकत नाही!

### पीसी शीट्स

यांना पॉलिकार्बोनेट शीट्स असं म्हटलं जातं. हलकं तरीही खूपच बळकट असणारं हे उत्पादन भारतात 'जीई' या नावाखाली जनरल इलेक्ट्रिक कंपनी विकते तर विदेशात ते एक्सेल नावानं जैन उद्योग विकत असतो. ५० टक्के देशात तर उर्वरित ५० टक्के विदेशात खपते. येत्या वर्षात यांची विक्री एकंदर रुपये ७५ कोटींच्या घरात जाईल.

### भाजीपाला व फळप्रक्रिया

पांढऱ्या कांद्याचे निर्जलीकरण करून विकण्याचा उद्योग



• फळांवर प्रक्रिया करणारा कारखाना



• जीआयएसएल फॅक्टरी

सर्व १०० टक्के उत्पादन निर्यात करतो. अतिप्रगत अशा अमेरिका, युरोपात तो जातो. गेल्या ५ वर्षांत ५० कोटींपर्यंत पोचलेली ही निर्यात पुढच्या वर्षी ७० कोटींना पोचण्याची आशा आहे. लवकरच भाजीपाला, लाल व हिरवी ढोबळी मिरची, तसेच पपई, आंबा, केळी यांचेही निर्जलीकरण करून विकण्याचा मानस आहे. कांद्यासाठी हमीभाव तत्त्वावर सुमारे ३००० एकर जमिनीवर 'करार-शेती' अस्तित्वात आहे ती लवकरच ५००० एकरांवर जाईल. त्यासाठी लागणाऱ्या संकरित, उति-संवर्धित व संशोधित बियाण्यांवर संशोधन-विकास चालू आहे. त्यामुळे निर्यातयोग्य गुणवत्तेचा कच्चा माल मिळण्याची हमी मिळते.

### फळप्रक्रिया

आंबा, केळी, पेरू, पपई, आवळा, डाळिंब या फळांचा रस काढणं, गर तयार करणं, प्युरी करणं असा हा उद्योग आहे. यांमधील ५० टक्के माल भारतातच खपतो तर उर्वरित ५० टक्के निर्यात होतो. गेल्या पाच वर्षांत या उद्योगाची विक्री ५५ कोटींवर गेलीय तर पुढील वर्षी ती ७५ कोटींवर जाईल.

### जैव तंत्र

अत्याधुनिक अशा जैव तंत्राचा शेतकऱ्यांना थेट घसघशीत फायदा मिळवून देणारं पहिलंवहिलं जिवंत उदाहरण म्हणजे केळी रोपं. केळी पीक २० महिन्यांऐवजी ११ महिन्यांत, उत्पादन ८-१० किलोंपासून थेट ३५ किलोंपर्यंत देणारी टिश्यूकल्चर केळी रोपं सुरुवातीला २५ रुपयांत मिळत होती ती आता फक्त ११ रुपयांत देतो आहोत. पाचच वर्षांत मागणी ७५ लाख रोपांपर्यंत पोचलीय. आता केळीच्या आणखी नव्या जाती देणार आहोत.

जैव तंत्रात संशोधन जोरात चालू आहे. कांदा, ऊस, साग असे विषय भविष्यात आहेत.

प्रश्न : आपले आगामी महत्त्वाकांक्षी प्रकल्प कोणते असणार आहेत?

उत्तर : **बायो डिझेल प्रकल्प**


वनएरंड (जट्रोफा) या झाडाच्या बियांमधील तेलापासून डिझेल उत्पादन करण्याच्या प्रयत्नात आम्ही सहभागी आहोत. राष्ट्राच्या ऊर्जा गरजांमध्ये स्वावलंबी होण्यासाठी देशानं कंबर कसलीय. आम्ही मग मागे का राहू?

### बायो गॅस प्रकल्प

ऊर्जेचं मूल्य सतत वाढतच राहणार आहे. म्हणून अपारंपरिक ऊर्जा स्रोतांकडं वळणं अगत्याचं आहे. बायो गॅस आम्ही वापरत आहोत, पण तो वापर वाढवायचाय.

### ताज्या फळांची निर्यात

अतिशय नाजूक, अवघड आणि आत्मघातकी असा हा विषय असला तरी जैन उद्योगाचा शेतीशी असलेला घट्ट संबंध, बांधिलकी तसंच शेतकऱ्यांचा विश्वास, गुडविल, भरवसा यांमुळं इथंही आम्ही यशस्वी होऊ. देशाचं यात नेतृत्व करू. खरं पाहता भारतात सर्वांत जास्त फळं पिकतात आणि निर्यात नगण्य! आम्ही तंत्र सुधारू, उत्पादन सुधारू, इन्फ्रास्ट्रक्चर सुधारू व यश खेचून आणू.



● हैदराबाद कारखाना

## सौरऊर्जा

सौरऊर्जेवर पाणी तापविणारी यंत्रणा आम्ही यशस्वीरीत्या लोकांपर्यंत पोचवली आहे. त्यापाठोपाठ आता सौरऊर्जेवर चालणारे दिवे व अन्य घरगुती उपकरणेही येत आहेत. खेडोपाडी व शहरांतही विजेचा वाढता वापर, कमी पुरवठा, येणारे व्यत्यय, वाढणारा खर्च, ढासळणारा विश्वास पाहता सौरऊर्जा हे भविष्यातलं ऊर्जा पुरवठ्याचे खात्रीचं साधन राहील यात शंका नाही.



• जैन हिल्स - २००३

प्रश्न : जागतिकीकरण, खुलीकरण, विदेशांमधून येणारी थेट गुंतवणूक (FDI) यांबद्दल काय वाटतं?

उत्तर : येत्या काळात पाण्याचं, पाणी वापरांचं व तदानुषंगिक तंत्रांचं महत्त्व अनन्य साधारणरीत्या वाढणार आहे. अर्थातच त्यासंबंधी उद्योगांचेही. जागतिकीकरणामुळे एक प्रकारचे खुलेपण, स्वातंत्र्य, पारदर्शकता नक्कीच येईल. गुणवंत तोच जगेल. जैवतंत्राचा वापर अफाट वाढेल. आम्ही त्यासाठी तयार आहोतच. विदेशांतून थेट गुंतवणूक यायला हवी. वाढायला हवी. आम्हीही त्यासाठी तयार आहोत. गरज असेल तरच तिचं स्वागत करू. विनाकारण हौसेपोटी घेणार नाही.

प्रश्न : उद्याचा विचार करता आजच्या समस्यांबद्दल काय वाटतं?

उत्तर : भारतात सर्वांत प्रगत मानल्या गेलेल्या महाराष्ट्रात विजेबाबत अशी शोचनीय परिस्थिती यावी हे क्लेशकारक वाटतं. वाढते वीजदर, वीजचोरी इत्यादी अपप्रवृत्तींचा आपण खोलवर व खरा खरा विचार करायला शिकलं पाहिजे. कापूस एकाधिकार, झोपडपट्ट्या, वीज उत्पादन-वितरण, तोट्यातली महामंडळं यांबाबत आपण पारदर्शीपणानं केव्हा पाहायला शिकणार? ख़ाजगीकरणाची डंक-नौबत वाजवून दिखाऊपणा काय उपयोगी? उद्योगधंद्यांना विश्वासात घेऊन त्यांना विकासाचे आधारस्तंभ मानणार केव्हा? पोटात एक ओठात भलतंच हे यापुढं नाही चालणार!

प्रश्न : पुढील दहा वर्षांत सरकारबाबत, धोरणांबाबत; म्हणजे एकूणच तुमच्या अपेक्षा काय आहेत?

उत्तर : शासनानं उद्योगांच्या, उद्योजकांच्या अडचणींचा तळमळीनं आणि प्राधान्यानं विचार करायला हवा. तरच भवितव्य उज्ज्वल राहील. नाहीतर उद्योग दुसऱ्या राज्यात निमूटपणे निघून जातील. गेलेही आहेत. जातही आहेत. आपण, महाराष्ट्रानं आत्मपरीक्षण करायला हवंय. आपल्या नेतृत्वानं, राजकीय पक्षांनी, नोकरशहांनीदेखील पक्षीय पातळी विसरून याचा विचार करून कृती करायला हवी. नोकरशहांच्या कार्यक्षमतेचीही कडक तपासणी हवी. त्यांनाही जबाबदार धरण्यात यायला हवं. तसंच, निवडून दिलेल्या लोक-प्रतिनिधींना परत बोलवण्याचा अधि-कारही जनतेला हवाच. श्री. भवरलाल जैन यांनी लिहिलेल्या आणि 'ग्रंथाली-ज्ञानयज्ञा'नं प्रसिद्ध केलेल्या 'आजची समाज-रचना, तिचे स्वरूप व पुनर्बांधणी' या पुस्तकातही या मागणीचा स्पष्ट उल्लेख आहेच.

येत्या काळात बायोटेक्नॉलॉजी, इन्फोटेक, ॲग्री उद्योग यांना वाढतं महत्त्व येणार आहे आणि कामाचा प्रचंड वेग, गुंतवणूक व उत्पादन यांस महत्त्व येणार आहे. तिथं चालढकल, वेळकाढूपणा, खाबूगिरी चालणार नाही. जसा व्यवहार स्वच्छ हवा तशीच प्रतिमा हवी. नव्या युगाची ती गरज आहे, राहील. आपले नेतृत्व, नोकरशाही थिटी पडली की संपलंच म्हणायचं.

प्रश्न : बिझनेससाठी एमबीए असावेत का?

उत्तर : एमबीए म्हणजे खास विवक्षित उद्योगांसाठी, विषयांसाठी घडविलेले तज्ज्ञ. ही संकल्पना विदेशी आहे. साहजिकच विदेशी पंचतारांकित उद्योग व्यवसायांनी त्यांना उचलून धरलंय. महत्त्व आणलंय. कल्पना तशी वाईट नाही. परंतु आपल्या देशातल्या उद्योगधंद्यांमध्ये असं अत्यंत टोकाचं स्पेशलायझेशन तितकंसं कामी येत नाही हा आमचा अनुभव आहे. इथं गरज आहे लवचीक आणि तरतरीत मेंदूची तो जसा



• जैनग्रूपचे अध्यक्ष - भवरलाल जैन (ऊर्फ भाऊ) त्यांच्या चारही मुलांसमवेत - डावीकडून अजित, अशोक, अनिल, अतुल

वळवाल, जिथं वळवाल तिथं अगदी चपखलपणे फिट्ट बसणारा हवा.

प्रश्न : आपले पिताजी 'भवरलाल जैन' यांच्या मार्गदर्शनाबद्दल काय सांगाल?

उत्तर : भाऊ हे खरे पहिल्या पिढीचे उद्योजक. शून्यातून सर्व निर्माण करणारे. त्यांच्या छत्रछायेखाली आम्ही वाढलो. पोसलो. ते स्वत: म्हणजे एक चालतंबोलतं विद्यापीठच आहेत. कामासंबंधी, उद्योगासंबंधी त्यांचं जे तत्त्वज्ञान आहे तेच शाश्वत राहणार आहे. Work is life हे त्यांचं तत्त्वज्ञान त्यांनी जन्मभर राबवलंय. आम्ही ते आचरणात आणण्याचा प्रयत्न करतोय. ही शिदोरी आम्हाला जन्मभर पुरणारी आहे.

प्रश्न : एकत्रित उद्योजक कुटुंबाची पद्धत यापुढेही राहील का? नामांकित उद्योग घराण्यांचे विघटन होते आहे. एकीकडे एकत्रित कुटुंब पद्धती संपून न्यूक्लिअर फॅमिलीज वाढताहेत. या पार्श्वभूमीवर जुनी औद्योगिक घराणी टिकणार का?

उत्तर : कालय तस्मै नम:।

काळ बदललाय. आणखी बदलणार आहे. जुनी नामांकित औद्योगिक घराणी काळाच्या ओघात एकत्र राहणार नाहीत टिकणार नाहीत असं नाही काही टिकतील, पण अधिकाधिक विभक्त होत राहतील. येणाऱ्या पिढ्यांमध्ये जिथं जिथं काळाला साजेसं स्पर्धात्मक चैतन्य, बुद्धिमत्ता, कष्ट, ज्ञान राहील तिथं ते ते घराणं न टिकायला काय झालं? पण ती घराण्याची 'देन' नसेल, ती स्वकष्टार्जित धार असेल. बिर्ला, टाटा, अंबानी, किर्लोस्कर, रुईया, थापर, अशी कोणतीही घराणी घ्या. नियम हाच राहील. पण याच जोडीला नव्या युगाला साजेशी विप्रो, इन्फोसिस यांसारखी हिरे-माणके येतच राहतील. यांना घराणी असं तरी म्हणता येईल का?

जे उद्योगधंद्याचं तेच एकत्र कुटुंबाचं. काळाच्या ओघात विभक्त कुटुंबपद्धती चांगली रुजलीय पण कोणी सांगावं, जगण्याची मूल्यंच आता नव्यानं विस्थापित होताहेत. त्यामध्ये पुन्हा एकदा एकत्र कुटुंबपद्धती नव्या स्वरूपात कशावरून नाही अवतार घेणार?

**– राजीव जोशी**